मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# संजोग वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

## भव्य रॅली, पदयात्रेसह जोरदार शक्तीप्रदर्शन : आदित्य ठाकरे, माणिकराव ठाकरे, अमोल कोल्हे, रोहित पवारांची उपस्थिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापुरुषांना अभिवादन करून आणि आराध्य दैवतांच्या मंदिरात आशिर्वाद घेऊन, तसेच भव्य दुचाकी रॅली, पदयात्रेने जोरदार शक्तिप्रदर्शन करीत मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांनी आज, मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.

आकुर्डी येथील मावळ लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांच्याकडे संजोग वाघेरे पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत आमदार रोहित पवार, कॉंग्रेसचे आमदार संजय जगताप, जिल्हाप्रमुख माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शेतकरी कामगार पक्षाचे नेते माजी आमदार बाळाराम पाटील, कॉंग्रेस शहराध्यक्ष कैलास कदम, जे. एम. म्हात्रे, माऊली दाभाडे, जगन्नाथ शेवाळे आदी उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्यापूर्वी पिंपरीगाव येथून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन व ग्रामदेवत भैरवनाथ मंदिरात आशिर्वाद घेऊन दुचाकी रॅलीस सुरुवात झाली. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांचे स्मारक, चिंचवडगावात क्रांतीवीर चापेकरांच्या स्मारकास अभिवादन, महासाधू मोरया गोसावी मंदिरात आशिर्वाद घेऊन रॅली आकुर्डीतील खंडोबा माळ येथे पोहोचली. खंडोबा मंदिरात आशिर्वाद घेऊन परिवर्तन रथातून संजोग वाघेरेंसह महाविकास आघाडीचे नेते अभिवादन करत पदयात्रेची सुरुवात झाली. संजोग वाघेरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आकुर्डी प्राधिकरणातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयापर्यंत पदयात्रा पोहोचली.

या पदयात्रेत युवासेनेचे प्रमुख तथा माजी पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे, कॉंग्रेसचे नेते माणिकराव ठाकरे, खासदार डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, शेतकरी कामगार पक्षाचे नेते तथा माजी आमदार बाळाराम पाटील, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) उपनेते तथा आमदार सचिन अहिर, जिल्हाप्रमुख ॲड. गौतम चाबुकस्वार, तसेच इतर सर्व पक्ष, संघटना यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पदयात्रेत घुमला "जय भवानी, जय शिवाजी"चा नारा

» उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांचा अर्ज दाखल करण्यासाठी जात असताना दुचाकी रॅली व संपूर्ण पदयात्रेत निष्ठावंत शिवसैनिकांचा "जय भवानी, जय शिवाजी", "छत्रपती शिवाजी महाराज की जय"अशा घोषणा देत उत्साह संचारत होता. तर, "स्वाभीमानी महाराष्ट्राचा बुलंद आवाज, उध्दव ठाकरे... उध्दव ठाकरे..." अशा घोषणांमधून खरी शिवसेना एकच असल्याचे चित्र शिवसैनिकांनी पदयात्रेतूनच दाखवून दिले.

### 'विजयाला गुलाल उधळणार'

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील म्हणाले की, "देशाची लोकसभा निवडणूक सर्वार्थाने महत्त्वपूर्ण आहे. जनहितापेक्षा स्वहिताला प्राधान्य देणा-या, देशातील जनतेची फसवणूक करणा-या प्रवृत्तीविरुध्द ही निवडणूक होत आहे. महागाई, बेरोजगारीविरुध्द आणि दडपशाहीच्या राजकारणाविरोधात निर्णय घेण्यासाठी मतदार तयार आहेत. पुन्हा एकदा मावळ लोकसभा मतदारसंघात गद्दारी गाडली जाईल आणि निष्ठावंत शिवसैनिकांचा विजय होईल. स्वाभीमानी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष मावळचा गड कायम राखणार आहे. महाविकास आघाडीचा प्रत्येक कार्यकर्ता विजयाला गुलाल उधळणार आहे".

# पार्थ पवारच्या पराभवाचा बदला घेणार

## अजितदादा पार्थ पवारचा पराभव विसरले : रोहित पवारांचा अजित पवारांना खोचक टोला

**पिंपरी | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवा नेते रोहित पवार यांनी अजित पवारांना खोचक टोला लगावला आहे. श्रीरंग बारणे यांच्या विरोधात आम्ही प्रचार करून भाऊ पार्थ पवार याचा बदला घेणार आहे. अजित पवार हे पार्थ पवार याचा झालेला पराभव विसरले असतील आम्ही अद्यापही त्याचा पराभव विसरलो नाही, असे म्हणत रोहित पवार यांनी अजित पवार यांना टोला लगावला आहे. रोहित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

रोहित पवार म्हणाले, संजोग वाघेरे यांच्या बाजूने आजचे वातावरण आहे. वाघेरे हे नवीन खासदार असतील. असा विश्वास रोहित पवार यांनी व्यक्त केला आहे. पुढे ते म्हणाले, अजित पवार हे शरद पवार यांना वडील मानायचे. त्यांना सोडून स्वतःच साम्राज्य आणि कारवाईपासून लपून राहण्यासाठी



महायुती आणि भाजपसोबत अजित पवार गेले आहेत. अजित पवारांनी वडिलांचा विचार केला नाही. पुढे ते म्हणाले, ज्या व्यक्तीने मुलाचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. त्या गोष्टी विसरून ज्या उमेदवाराने पराभव केला त्या उमेदवाराचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी अजित पवार येत असतील तर यावरूनच अजित पवारांची परिस्थिती कळून येत आहे. अजित पवार हे या सर्व गोष्टी विसरले असतील. मला पार्थला सांगायचं आहे. या गोष्टी मी विसरलो नाही. ज्या व्यक्तीने तुझा पराभव केला. त्या व्यक्तीच्या विरोधात प्रचार करण्यासाठी तुझा भाऊ इथं आलेला आहे.

पुढे रोहिते पवार म्हणाले, काही गोष्टी अजित पवार हे खोटं बोलत आहेत. एबी फॉर्म मला अजित पवारांनी दिला. मला निवडणूक लढायची होती. अपक्ष लढायचं नव्हतं. अजित पवार पन्नास टक्के खरे आणि खोटं बोलत आहेत. पुढे ते म्हणाले, पार्थ पवार यांना वाय नव्हे तर झेड सुरक्षा द्यायला हवी. महाराष्ट्रात वाढलेल्या गुन्हेगारीवर देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष नाही. नेत्यांच्या मुलांना सुरक्षा देत आहेत.

# बारामतीमध्ये 'तुतारी' चिन्हावरून वाद

## अपक्ष उमेदवाराला 'तुतारी' चिन्ह : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा आक्षेप

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांना सोमवारी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये सोयल शहा युनूस शहा शेख या अपक्ष उमेदवाराला 'तुतारी' हे चिन्ह देण्यात आले. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून आक्षेप घेण्यात आला आणि थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली. त्यानुसार याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगाकडून निर्णय घेतला जाणार आहे.

बारामती मतदारसंघासाठी १२ ते १९ एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. या कालावधीत ५१ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या अर्जांची छाननी २० एप्रिल रोजी झाली. छाननीमध्ये पाच अर्ज बाद होऊन ४६ उमेदवारांचे अर्ज वैध ठरविण्यात आले. त्यानंतर सोमवारी (२२ एप्रिल) दुपारी तीन वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज माघार घेण्याची मुदत होती. त्यामध्ये आठ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे या मतदारसंघात ३८ उमेदवार निवडणूक रिंगणात असणार आहेत.

उमेदवारांची संख्या निश्चित झाल्याने अपक्ष उमेदवारांना मतदानासाठी चिन्हांचे वाटप करण्यात आले. त्यामध्ये शेख यांनी पसंतीमध्ये 'तुतारी' या चिन्हाची मागणी केली होती. त्यानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून हे चिन्ह शेख यांना देण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे चिन्ह 'तुतारी फुंकणारा माणूस' असे आहे. त्यामुळे शेख यांना देण्यात आलेल्या चिन्हावर शरद पवार गटाकडून आक्षेप घेण्यात आला आणि पक्षाकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला याबाबतच्या आक्षेपाचा मेल करण्यात आला आहे.



दरम्यान, बारामती मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढविणाऱ्या शेख यांनी मुक्त चिन्हांसाठी असलेल्या चिन्हांच्या पहिल्या पसंतीक्रमात 'तुतारी' या चिन्हाची मागणी केली होती. पसंतीक्रमानुसार त्यांचा पहिला पसंतीक्रम तुतारी होता. त्यामुळे अपक्ष उमेदवार शेख यांना हे चिन्ह देण्यात आले.

# मिळकतकर विभागाचा पुणेकरांना जाच

## 'पीटी 3' अर्ज भरूनही मिळेना सवलत : 22 हजार मिळकतदारांना त्रास

**पुणे | प्रतिनिधी**

मिळकतदारांनी 'पीटी ३' अर्ज सादर केल्यानंतर पुणे महापालिकेकडून मिळकतकरात सवलत दिली जाते. मात्र हा अर्ज सादर करूनदेखील तसेच करात ४० टक्के सवलत मिळण्यास पात्र असताना देखील कोणतीही सवलत दिली जात नाही. मिळकतकर विभागाच्या या जाचाला पुणेकर त्रासले आहेत.

मिळकतकरात सवलत देण्याची प्रक्रिया सुरू असून पुढच्या बिलावेळी ती दिली जाईल, असे सांगून पूर्ण रकमेचा कर भरून घेतला जात आहे. मात्र सवलत कधी दिली जाणार याची माहिती मिळकतकर विभागाकडून सांगितली जात नसून उडवाउडवीची उत्तरे दिली जात असल्याने नागरिक वैतागले आहेत. सवलत दिली जाणार आहे नाही, हे एकदाचे सांगून मिळकतकर विभागाने रडगाणे बंद करावे, असा संतापजनक पवित्रा मिळकतदारांनी घेतला आहे.




राज्य शासनाच्या आदेशानुसार पुण्यातील मिळकतधारकांना २०१८ मध्ये रद्द करण्यात आलेली ४० टक्के करसवलत पुन्हा लागू करण्यात आली आहे. ही सवलत २०१९ पासून लागू झाली आहे. त्यानुसार जीआयएस सर्वेक्षणानंतर आणि १ एप्रिल २०१९ नंतर ज्यांच्या मिळकतींची नोंद झालेली आहे, अशांना ४० टक्के सवलत नाही. त्यांनी ती पुन्हा मिळावी यासाठी रहिवासी पुरव्यांसह 'पीटी ३' अर्ज भरावा, असे आवाहन पुणे महापालिकेने केले होते. त्याप्रमाणे संबंधित मिळकतदारांकडून महापालिकेला अर्ज केला आहे. अर्ज प्राप्त झाल्यानंतर महापालिकेने या मिळकतदारांना करात सवलत देणे क्रमप्राप्त होते. मात्र त्यांना देण्यात आलेल्या मिळकतकराच्या नोटिशीमध्ये कोणतीही सवलत देण्यात आली नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याने महापालिकेच्या मिळकरकर विभागाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

> 'पीटी ३' अर्ज भरलेल्या प्रत्येक मिळकतदाराला सवलत दिली जाते. मिळकतकर विभागाच्या प्रणालीमध्ये ही सवलत देण्याची प्रक्रिया सुरू आहे. पालिकेच्या एकूण २२ हजार मिळकतदारांना ही समस्या येत आहे. प्रणालीमध्ये दुरुस्ती होण्यास अडथळा येत असल्याने आता ही प्रक्रिया ऑफलाईन केली जाणार आहे. मिळकतदारांनी काळजी करू नये. आता ज्याप्रमाणे बिल पाठवले आहे, त्याची पूर्ण रक्कम भरावी. ही समस्या दूर झाल्यानंतर मिळणारी सवलत पुढच्या बिलावेळी दिली जाईल.
>
> **- माधव जगताप, करआकारणी आणि करसंकलन विभागप्रमुख, पुणे महापालिका.**

महापालिकेच्या मिळकतकर विभागाने पाठविलेल्या नोटिसांनुसार मिळकतदारांना कर भरण्याची सक्ती केली जात आहे. परंतु सवलतीबाबत विचारले असता, "त्यावर काम सुरू असून सवलत देण्याची प्रक्रिया सुरू आहे. तुम्ही आधी पूर्ण रक्कम भरा, मग प्रक्रिया पूर्ण झाली की पुढच्या वर्षीच्या करात ती सवलत दिली जाईल," असे सांगितले जात आहे. परंतु गेल्या सात ते आठ वर्षांपासून हेच सुरू आहे. दरवेळी कर भरण्यास गेले की नव्याने अर्ज भरून द्यावा लागतो. ती तीच प्रक्रिया नेहमी करावी लागत आहे. त्यामुळे त्रास सहन करावा लागत असल्याचे मिळकतदरांचे म्हणणे आहे. महापालिकेने त्यांच्या ऑनलाईन प्रणालीमध्ये सुधारणा करून घ्यावी. तसेच 'पीटी ३' अर्ज सादर केल्यानंतर करात मिळणारी ४० टक्के सवलत द्यावी, त्यानंतरच बिल देण्यात यावे, अन्यथा महापालिकेला इच्छा असूनदेखील आमच्याकडून कर भरला जाणार नाही, असा पवित्रा घेतल्याचे मिळकतदारांनी सांगितले.

# हिंजवडी आयटी पार्कचा 'मार्ग' खडतर

## मेट्रोचे काम आणि रस्त्याच्या अनेक समस्यांमुळे आयटियन्सच्या समस्यात आणखी भर

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगाच्या नकाशावर 'आयटी हब' म्हणून नावलौकिक मिळवलेली हिंजवडी अद्यापही वाहतूक समस्यांतून सुटलेली नाही. मेट्रोचे काम आणि रस्त्याच्या अनेक समस्यांमुळे आयटियन्सच्या समस्यात आणखी भर पडली आहे. मेट्रो आणि एमआयडीसी या दोन स्वतंत्र विभागांचा समन्वय नसल्याने त्याचा फटका येथील आयटियन्स, उद्योजक, शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना बसत आहे. वाकड ते हिंजवडी चौक हा मार्ग ओबडधोबड अन् असमतोल असल्याने दुचाकी घसरून अपघात होत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून आयटियन्सच्या मागणीला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात येत आहेत.

वाकड ते हिंजवडी या मार्गात अनेक अडथळे असून, मेट्रोचे काम सुरू होण्यापूर्वी वाहतूक नियंत्रणाबाबत आवश्यक उपाययोजना करण्याची मागणी आयटियन्सकडून करण्यात आली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केल्याने गेल्या पाच वर्षांपासून हा त्रास सहन करावा लागत आहे. तो अजूनही तसाच आहे. मेट्रोच्या कामामुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुर्दशा झाली आहे. त्यातच वाकड उड्डाणपुलापासून सुरू होणारा हा मार्ग पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक इथपर्यंत खडतर बनला आहे. रस्त्याच्या उजव्या बाजूला पूर्ण सिमेंटचा रस्ता तर, डाव्या बाजूला सिमेंटचे ठोकळे (ब्लॉक) लावण्यात आले आहेत. या रस्त्यावर अवजड वाहने, बसेस यांची वर्दळ असल्याने डाव्या बाजूचा मार्ग खचत आहे. त्यामुळे रस्त्यावरील ड्रेनेजचे चेंबरदेखील वर आले आहेत. त्याचप्रमाणे हा रस्ता असमतल झाला असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. त्यामुळे वाहने घसरून मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. त्यातच बेशिस्त पार्किंग आणि अतिक्रमणामुळे या समस्येत भर पडत आहे.



सिमेंट काँक्रिटच्या रस्त्यावर ठिकठिकाणी खच पडले आहे. तसेच, काही ठिकाणी सिमेंटचे ब्लॉक उखडून गेल्याने खड्डे पडले आहेत. हा रस्ता मोठा वर्दळीचा आहे. दिवसाला रोज पाच ते सहा लाख आयटियन्स या रस्त्याचा वापर करतात. पूर्वी केवळ कामासाठी हिंजवडीच्या रस्त्याला आयटियन्स येत होते. मात्र आता या परिसरात मोठ-मोठ्या सोसायट्या होत असल्याने लोकसंख्यादेखील वाढली आहे. मात्र अद्याप रस्त्याची सुविधा आणि कनेक्टिव्हिटी उपलब्ध नसल्याने समस्या आहे तिथेच आहे. पर्यायी मार्ग आणि सार्वजनिक वाहतूक सक्षम नसल्याने नाईलाज कामगार वर्गाला दुचाकींचा वापर करावा लागतो.

### .. त्यामुळे दुचाकींचा वापर

हिंजवडी आयटी परिसरात वाढत जाणारी वाहतूक समस्या आणि पार्किंग या दोन कारणांमुळे आयटी कर्मचारी दुचाकी वापरतात. मात्र, रस्त्याची दुरवस्था आणि अतांत्रिक रस्त्यामुळे सुमारे तीन लाख दुचाकी वापरणाऱ्या कामगारांना समस्या भेडसावत आहे.

### समस्या सुटेना, कोंडी फुटेना

**» हिंजवडी या परिसरातील वाहतूक समस्या कायमच इतर कर्मचारी आणि पोलिसांची डोकेदुखी राहिलेली आहे. स्वतंत्र वाहतूक व्यवस्था, एकेरी मार्ग, मार्गात बदल आणि वाहतूक पोलिसांकडून देखील उपाययोजना राबवण्यात आलेल्या आहेत. मात्र, मूळ समस्या या सुटल्या नसून, वाहतूक कोंडीतून अद्याप वाहनचालक सुटू शकले नाहीत.**

"गेल्या अनेक वर्षांपासून आयटी प्रोफेशनल्सकडून किमान रस्त्याची अपेक्षा केली जात आहे. मात्र तो प्रश्न अद्याप सुटलेला नाही. आयटी पार्कला इतर पर्यायी कनेक्टिव्हिटी देखील नाही. परिणामी, वाहतूक कोंडीतून आणि जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. अनेकदा मागण्या , पाठपुरावा करून देखील त्याची दखल घेतली नाही.

**- पवनजीत माने, फोरम फॉर आयटी इंडस्ट्री, राज्य समन्वयक.**

# पुरंदरमध्ये महायुतीचे नेते एकवटले

## सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराला सुरुवात : विजय शिवतारे, जय पवारांच्या संयुक्त दौऱ्याला सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

बारामती लोकसभा मतदारसंघाच्या हालचालींकडे राज्याचं लक्ष लागलं आहे. बारामतीत सुनेत्रा पवार विरुद्ध सुप्रिया सुळे अशी लढत आहे. त्यातच बारामतीत महायुतीत काही दिवसांपासून नाराजी दिसत होती. त्यात विजय शिवतारेंनी बंड करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर शिवतारेंचं बंड थंड झालं. भाजपच्या काही नेत्यांकडूनही काही प्रमाणात विरोध दिसला मात्र आता सगळा बंड आणि विरोध शमला असून सगळे महायुतीचे नेते सुनेत्रा पवारांच्या प्रचारासाठी एकवटलेले दिसत आहे.

पुरंदर तालुक्यात महायुतीचे सर्व नेते एकवटले असून त्यांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. काल अजित पवारांनी कन्हेरीच्या मारोतीचं दर्शन घेत प्रचाराचा नारळ फोडला आणि सभा घेऊन पवारांवर फटकेबाजी केली. त्यानंतर आजच सगळ्या महायुतीच्या नेत्यांनी एकत्र येत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवारांच्या प्रचाराला सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर आज माजी मंत्री विजय शिवतारे,



भाजप नेते बाबा जाधवराव आणि जय पवार यांचा संयुक्त दौऱ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. पुरंदर तालुक्यातील मांडकी येथून हा दौरा सुरु करण्यात आला आहे. उमेदवार संसदेत जाण्यासाठी घड्याळाला मतदान करण्याचं आवाहन महायुतीच्या नेत्यांकडून यावेळी करण्यात येत आहे.

सुनेत्रा पवारांना विजयी करण्यासाठी अजित पवारांनी कंबर कसली आहे. सगळ्याच नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना मतदानासाठी विनंती करताना अजित पवार दिसत आहे. त्यातच आता शिवसेना आणि भाजपच्या नेत्यांनीदेखील कंबर कसल्याचं दिसत आहे. विजय शिवतारेंनीदेखील सुनेत्रा पवारांना विजयी करण्याता चंग बांधला आहे. सासवड तालुक्यातदेखील मोठ्या सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. या सभेतून शिवतारेंनी आणि राज्याच्या महायुतीच्या महत्वाच्या नेत्यांनी सुनेत्रा पवारांना विजयी करण्याचं आवाहन केलं होतं. आता इंदापूरातच पुन्हा एकदा संयुक्त प्रचाराला सुरुवात केली आहे. विकास आणि बारामतीचे वेगवेगळे प्रश्न समोर ठेवत त्यावर तोडगा काढण्यात येणार असल्याचा विश्वास देत प्रचार करताना दिसत आहे.

बारामतीत सुप्रिया सुळेंचा प्रचारदेखील मोठ्या प्रमाणात सुरु आहे. पवार कुटुंबातील प्रत्येकजण सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी मैदानात उतरल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे बारामतीत गड कोण जिंकणार, हे पाहणं महत्वाचं असणार आहे.

# पर्यावरण उद्यानासाठी झाडांचाच बळी

## वानवडी वनक्षेत्रातील चार एकर जागेवरील शेकडो झाडांची कत्तल झाल्याचा आरोप : नागरिकांचा संताप

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र इको टूरिझम डेव्हलपमेंट बोर्डाच्या वतीने रुबी हॉल क्लिनिकच्या पाठीमागे असलेल्या वानवडी येथील राखीव वनजमिनीवर इको-टूरिझम पार्क उभारण्यात येत आहे. चार एकर जागेवर होणाऱ्या या उद्यानासाठी शेकडो झाडांची कत्तल झाल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. दुसरीकडे, झाडे तोडली हे खरे असले तरी ती झाडे उंदीरमारीची होती आणि पर्यावरणदृष्ट्या फार महत्त्वाची नव्हती, असा दावा वनविभागाकडून करण्यात येत आहे.




महाराष्ट्र शासन, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबई यांनी गतवर्षी २८ नोव्हेंबर रोजी राखीव वनजमीन सर्वेक्षण क्रमांक ४९ वानवडी येथे पर्यटनाशी संबंधित विकास कामांना मान्यता दिली होती. त्यानुसार हे काम सुरू आहे. येथील रहिवाशांनी मात्र या कामांना विरोध केला आहे.

रहिवाशांच्या चळवळीचे नेतृत्व करणारे नरेश छेटिजा म्हणाले, “ही जमीन नरेन हिल सोसायटीच्या समोर आहे. या ठिकाणी खूप झाडे होती. मात्र, प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी ही झाडे तोडण्यात आली आहेत. जंगलाच्या राखीव जमिनीवर पर्यटनाच्या उद्देशाने अस्तित्वात असलेली झाडे तोडू नये आणि या प्रकल्पाशी संबंधित बांधकाम व इतर उपक्रमांना प्रतिबंधित करावे. संबंधित वन अधिकाऱ्यांना झाडांचे पुनर्रोपण करण्याचे निर्देश द्यावे, अशी आमची मागणी आहे.”

वन विभागाकडून दाद मिळाली नाही म्हणून छेटिजा यांनी नवी दिल्ली येथील राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (NGT) मुख्य खंडपीठात तक्रार केली. हे प्रकरण राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण (पश्चिम विभाग) खंडपीठाचे न्यायिक सदस्य दिनेश कुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे.

या संदर्भात प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि वन दलाचे प्रमुख (पीसीसीएफ) आणि प्रधान मुख्य वनसंरक्षक (एचओएफएफ) यांच्या वकिलांनी असे म्हणणे आहे की ही झाडे उंदीरमारीची होती. ही झाडे तोडावी असेच वनविभागाचे धोरण आहे. कारण ही झाडे इतर झाडांना वाढू देत नाहीत. यासंदर्भात संपर्क साधला असता पर्यावरणशास्त्रज्ञ माधव गाडगीळ म्हणाले, “हे वनविभागाने चालवलेले मोठे नाटक आहे. हा निधीचा गैरवापर आहे. कारण ग्लिरिसिडिया ही विदेशी प्रजाती आहे आणि ती वनविभागाकडून काढण्याची किंवा साफ करण्याची गरज नाही. जर त्यांना माहिती होते की, अशी झाडे वेगाने वाढतात आणि सर्वत्र पसरतात तर त्यांनी का लावली? हा निव्वळ मूर्खपणा आहे. त्यांनी तज्ज्ञांकडून तपासून पाहण्याची गरज आहे. मात्र, वनविभाग आणि इतर संबंधित अधिकारी तज्ज्ञांशी बोलत नाहीत. त्यांच्याकडे कोणतीही वैज्ञानिक आकडेवारी नाही.”

### फक्त उंदीरमारीचीच झाडे तोडल्याचा वनविभागाचा दावा

» पुणे वनविभागाकडून महादेव मोहिते यांनी ८५ पानांचा अहवाल सादर केला आहे. त्यात म्हटले आहे की, फक्त उंदीरमारीचीच झाडे तोडली आहेत. जमिनीतील ओलावा वाढावा, यासाठी वनविभागाकडून या झाडांचे रोपण करण्यात आले होते. परंतु गेल्या काही वर्षांत ही झाडे मोठ्या प्रमाणावर वाढली आहेत. याचा आता स्थानिक वनस्पती प्रजातींसाठी धोका निर्माण झाला आहे. संयुक्त राष्ट्राने हे दशक ‘इकोसिस्टम रिस्टोरेशन डिकेड’ म्हणून घोषित केले आहे. त्यामुळे, वनविभागाने पुण्यातील आणि आजूबाजूच्या टेकड्यांमधून उंदीरमारी हटविण्याचा उपक्रम सुरू केला आहे.

# कोंबड्यांच्या खुराड्यात घुसली बिबट्या मादी

## शिरूर तालुक्यातील शिंदोडी गावातील घटना : वनविभागाच्या पथकाने तिला बिबट निवारण केंद्रात हलवले

**पुणे | प्रतिनिधी**

शिकारीच्या शोधात आलेली एक बिबट्या मादी कोंबड्यांच्या खुराड्यात घुसली. कोंबड्या बाहेर पळाल्यानंतर संबंधित शेतकऱ्याने प्रसंगावधान राखत खुराड्याचे दार बंद करून त्याला कडी घातली. त्यामुळे ही बिबट्या मादी खुराड्यात बंद झाली. त्यानंतर वन विभागाला याबाबत माहिती कळवण्यात आली. वनविभागाच्या पथकाने तिला भुलीचे इंजेक्शन देऊन बेशुद्ध करीत माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात हलवले. ही घटना शिरूर तालुक्यातील शिंदोडी गावामध्ये शनिवारी रात्री घडली.



घोड धरणाच्या क्षेत्रात मोडणाऱ्या निमोणे, गुनाट आणि शिंदोडी या गावांच्या परीक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बागायती शेती केली जाते. या परिसरात प्रामुख्याने ऊसाची शेती केली जाते. ऊसाचे मोठे क्षेत्र असल्याने बिबट्याला लपण्यासाठी तसेच शिकारीसाठी हा परिसर उपयोगी ठरतो. शिकारीला आलेल्या बिबट्याचे अनेकदा शेतकऱ्यांना दर्शन झालेले आहे. शिंदोडी येथील शेतकरी मच्छिंद्र सोनवणे यांच्या घरासमोर कोंबड्यांचा खुराडा आहे. शिकारीच्या शोधात आलेली बिबट्या मादी सोनवणे यांच्या खुराड्याजवळ आली. खुराड्याचा दरवाजा उघडा असल्याने ती कोंबड्यांची शिकार करण्यासाठी खुराड्यात घुसली. त्यावेळी कोंबड्यांचा जोरजोरात आवाज येऊ लागला. कोंबड्या बाहेर पळू लागल्या.

कोंबड्यांच्या आवाजाने सोनवणे आणि त्यांचे कुटुंबीय जागे झाले. त्यांनी बाहेर येऊन पाहिले असता बिबट्याची मादी खुराड्यात त्यांच्या दृष्टीस पडली. प्रसंगावधान राखत त्यांनी खुराड्याचे दार बाहेरुन कडी घालत बंद केले. त्यामुळे या बिबट्या मादीला बाहेर पडता आले नाही. या संदर्भात वनविभागाला माहिती कळविण्यात आली. जुन्नरच्या माणिकडोह बिबट निवारण केंद्राचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. चंदन चवणे, त्यांचे सहकारी आकाश डोळस, वैभव नेहरकर, शिवाजी मोघे, शिरुरचे वनपाल गणेश म्हेत्रे, वनरक्षक संतोष भुतेकर, वनकर्मचारी दिनेश गोरड, नवनाथ गांधले, संपत पाचुंदकर यांनी शिंदोडी येथे धाव घेतली. अडकलेल्या बिबट्या मादीला डार्ट भुलीच इंजेक्शन देण्यात आले. तिला बेशुद्ध करून माणिकडोह बिबट निवारण केंद्रात हलविण्यात आले.